कर्णधारपद जबाबदारीचे -पंत

गुवाहाटी : राष्ट्रीय संघाचे नेतृत्व करायला मिळणे ही केव्हाही अभिमानाची गोष्ट असते. पण, जेव्हा ते एका सामन्यासाठी असते त्या वेळी ती सर्वोत्तम संधी नसते. कर्णधारपद हे संघातील सर्वात जबाबदारीचे पद असते, असे मत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दुसऱ्या कसोटीत नेतृत्व करणाऱ्या ऋषभ पंतने सांगितले. नियमित कर्णधार शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे या कसोटी सामन्यात खेळू शकणार नाही. त्याच्या जागी पंत ही जबाबदारी सांभाळणार आहे. पंत भारताचा ३८वा कसोटी कर्णधार असेल.

एका सामन्यासाठी कर्णधारपदाची जबाबदारी मिळते तेव्हा ती निश्चितच सर्वोत्तम नसते. मला त्या पदासाठी योग्य समजले याचा मला अभिमान आहे असे सांगताना पंतने दुसरा सामना सर्वच दृष्ट्या आव्हानात्मक असल्याचे आणि ते स्वीकारण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले. ''कसोटी मालिका एका नाट्यमय वळणावर आहे. सामना जिंकून बरोबरी राखण्याचे आव्हान पेलण्यासाठी आम्ही तयार आहोत. कर्णधार म्हणून या सामन्यात खेळाडूंना स्वतःला व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देण्याकडे माझा कल असेल,'' असेही पंत म्हणाला.

''माझे जे काही ज्ञान आहे त्याचा मी मैदानावर फायदा करून घेईनच. पण, खेळाडूंनी सामन्याच्या परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करायला शिकणे खूप महत्त्वाचे आहे,'' असेही पंतने सांगितले.

पुन्हा खेळपट्टीच केंद्रस्थानी

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या निर्णायक कसोटीत भारताचे मालिका बरोबरीचे ध्येय

पीटीआय, गुवाहाटी

यजमानांना सन्मानाने मालिकेचा शेवट करण्याची तर, जागतिक कसोटी अजिंक्यपदाचे जेतेपद मिळवणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला भारतात मालिका जिंकण्याची संधी आज, शनिवारपासून गुवाहाटी येथे सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीदरम्यान मिळेल. मालिकेतील निर्णायक कसोटी सामन्यात पुन्हा एकदा खेळपट्टीच्या स्वरूपाविषयी गूढ कायम राहिल्याने पुन्हा एकदा हाच विषय लढतीच्या केंद्रस्थानी राहणार आहे.

शुभमन गिलच्या अनुपस्थितीत ऋषभ पंतला आव्हानात्मक नेतृत्व परीक्षेला सामोरे जावे लागेल यात शंका नाही. सामना जिंकून मालिकेत बरोबरी साधण्याचे कठीण काम भारताला करायचे आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे निर्णय हे गोंधळात टाकणारे ठरत असल्यामुळे त्यांनादेखील वेगळीच परीक्षा द्यावी लागणार आहे. तुलनेत दक्षिण आफ्रिका संघाकडे सध्या तरी गमावण्यासारखे काहीच नाही. सामना हरल्यानंतरही त्यांना बरोबरीचे समाधान असेल. पण, भारतात मालिका जिंकण्याची संधी साधण्यासाठी ते सर्वस्व पणाला लावतील. पहिला कसोटी सामना जिंकून त्यांचा आत्मविश्वास देखील दुणावलेला आहे.

मानेच्या दुखापतीमुळे सामन्याबाहेर गेलेल्या गिलच्या अनुपस्थितीत ऋषभ पंतला आपले नेतृत्व कौशल्य पणाला लावावे लागणार आहे. गिल दुसऱ्या कसोटीत खेळणार नाही हे सत्य होते. पण, भारतीय संघ व्यवस्थापनाने हे अखेरच्या क्षणापर्यंत जाहीर केले नाही. अखेरीस सामन्यापूर्वी दोन दिवस आधी गिल खेळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. दुसऱ्या कसोटी सामन्याची खेळपट्टी जशी केंद्रस्थानी राहणार तसे प्रत्येक दिवसाचा खेळ देखिल केंद्रस्थानी राहणार आहे. लवकर होणारा सूर्योदय आणि सूर्यास्त या दोन्ही गोष्टी दिवसाच्या खेळावर परिणाम करणाऱ्या ठरु शकतात. सहाजिक सामना नेहमीपेक्षा अर्धा तास लवकर सुरू होईल आणि लवकर संपेल. पण, संपतानाही अपुऱ्या प्रकाशाची अडचण येऊ शकते.

अपुरी तयारी असलेल्या खेळपट्टीवर पहिल्या कसोटीत भारताला पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट नकाशावर कसोटी केंद्र म्हणून पदार्पण करणाऱ्या बरसापारा स्टेडियमच्या खेळपट्टीबाबतचे गूड वाढत आहे आणि त्याभोवती प्रचंड नाट्यमय वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही कर्णधारांना सुरुवातीला खेळपट्टी फलंदाजीला साथ करेल आणि नंतर ती फिरकीला साथ देईल असेच वाटत आहे. पहिल्या कसोटीतही दोन्ही कर्णधारांचे मत असेच राहिले होते. मात्र, या वेळी बोलताना दोन्ही कर्णधारांनी कोलकात्यापेक्षा चांगले खेळले पाहिजे असे म्हटले आहे.

दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेसाठी कगिसो रबाडा दुसऱ्या सामन्यासाठी देखील अनुपलब्ध असेल. त्यामुळे मार्को यान्सन आणि कॉर्बिन बॉश यांच्यावर वेगवान गोलंदाजांची मदार राहील. पहिल्या कसोटी सामन्यातील विजयी संघात बदल करायचा झाल्यास दक्षिण आफ्रिका विआन मुल्डरला वगळण्याचा निर्णय घेऊ शकते. त्याच्या जागी फलंदाजी करू शकणारा फिरकी गोलंदाज सेनुरान मुथुसामी याची निवड होऊ शकेल. अगदीच मुथुसामीला न घेण्याचा निर्णय झाल्यास डेवाल्ड ब्रेव्हिस या फलंदाजाची निवड होईल आणि असे झाल्यास स्टब्सला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला यावे लागेल.

हा धक्का कसा पचवणार

गेल्या तीन दशकांपासून भारतीय संघांसोबत घरच्या मैदानावर खेळताना कायम विजयाची साथ होती. मात्र, अलिकडे ही साथ सुटायला लागली आहे. घरच्या खेळपट्टीवरही भारतीय संघ असुरक्षित वाटू लागला आहे. गेल्या वर्षी न्यूझीलंडने याची सुरुवात केली आणि आता दक्षिण आफ्रिकेनेही पहिल्या कसोटीत विजय मिळवत भारताच्या अडचणीत भर घातली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी एकापाठोपाठ कसोटीतून निवृत्ती घेतल्याने भारतीय संघ परिवर्तनातून जात असल्याचे हे चित्र असले, तरी ते संघ व्यवस्थापन हे स्वीकारण्यास तयार नाही. संघातील फलंदाजांकडे फिरकी खेळण्याचे योग्य तंत्र नाही हे सर्वात धक्कादायक आहे. तसेच, प्रतिस्पर्धी फलंदाजांवर नियंत्रण ठेवू न शकल्यामुळे फिरकी गोलंदाजांच्या क्षमतेवर चर्चा होणे, हे भारताच्या दृष्टीने सकारात्मक नाही.

- **वेळ** : सकाळी ९ वा.
- **थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्स २, जिओ हॉटस्टार अ‍ॅप.

संघरचनेबाबत मौन

सामन्याच्या पूर्वसंध्येला भारतीय संघाने अंतिम अकरा खेळाडूंविषयी मौन बाळगले आहे. शुभमन गिल खेळणार नसल्यामुळे साई सुदर्शनचा समावेश निश्चित आहे. पण, त्याचा फलंदाजी क्रमांक निश्चित नाही. प्रशिक्षक गंभीर यांनी पहिल्या कसोटीत वॉशिंग्टनला तिसऱ्या क्रमांकावर बढती दिली. आता सुदर्शन आल्यावर गंभीर काय निर्णय घेणार हे सामन्यातच कळेल. चार फिरकी गोलंदाजांचा निर्णय पहिल्या कसोटीत फसल्यानंतर आता अक्षर पटेल किंवा कुलदीप यादव यांच्यापैकी एकाला वगळले जाईल. ती जागा नितीशकुमार रेड्डीला मिळेल. हे दोनच बदल संभाव्य असले, तरी याचे अंतिम उत्तर सामन्यापूर्वीच मिळेल.

पहिल्याच दिवशी १९ फलंदाज गारद

पर्थ : उपखंडात फिरकीसमोर फलंदाजांच्या क्षमतेची कसोटी लगत असतानाच ऑस्ट्रेलियात सुरू झालेल्या अ‍ॅशेस मालिकेत वेगवान गोलंदाजांसमोर फलंदाजांची भंबेरी उडाली. पहिल्या कसोटीच्या सुरुवातीच्या दिवशी तब्बल १९ फलंदाज वेगवान गोलंदाजीसमोर गारद झाले.

मिचेल स्टार्कच्या (७/५८) भन्नाट गोलंदाजीसमोर इंग्लंडचा पहिला डाव ३२.५ षटकांत १७२ धावांत आटोपला, तर ऑस्ट्रेलियाची अवस्था दिवस अखेरीस ३९ षटकांत ९ बाद १२३ अशी झाली होती. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने (५/२३) प्रभावी गोलंदाजी केली. त्याला जोफ्रा आर्चर (२/११) आणि ब्रायडन कार्स (२/४५) यांनी चांगली साथ दिली. पहिल्या दिवसअखेरीस ऑस्ट्रेलिया अजून इंग्लंडच्या पहिल्या डावातील धावसंख्येच्या ४९ धावांनी पिछाडीवर आहे.

भारतात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत अडीच दिवसात खेळ संपल्यावर चहूबाजूंनी खेळपट्टीवर टीका झाली. ही आठवण ताजी असतानाच पर्थच्या नव्या कोऱ्या स्टेडियमवर पहिल्याच दिवशी १९ गडी बाद झाले आणि यावर चर्चा न होता, अ‍ॅशेस मालिकेला उत्साही सुरुवात अशी वर्णने होऊ लागली. तब्बल ५१ हजारहून अधिक प्रेक्षकांसमोर ही सगळी वाताहात झाली. सामन्याच्या पहिल्याच दिवशी हे चित्र राहिल्यामुळे हा सामना देखील असाच लवकर संपण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

रुपयाची डॉलरपुढे नीचांकी लोळण

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: डॉलरच्या तुलनेत घसरत्या रुपयाने सप्ताहअखेर शुक्रवारच्या सत्रात ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठली. प्रति डॉलर रुपया ९३ पैशांनी घसरून ८९.६१ वर ढेपाळला. दिवसभरातील सत्रात त्याने ८९.६५ या नीचांकी पातळीला स्पर्श केला होता.

या वर्षी आतापर्यंत, चलन ४.५३ टक्क्यांनी घसरले असून, डॉलरसापेक्षा रुपयाची कामगिरी ही इतर आशियाई चलनांच्या तुलनेत अतिशय सुमार राहिली आहे. ३० सप्टेंबर रोजी या रुपयाने ८८.८५ ही त्याची पूर्वीची सार्वकालिक सत्रांतर्गत नीचांकी पातळी नोंदवली होती. तर १४ ऑक्टोबर रोजी अमेरिकी डॉलरच्या तुलनेत ८८.८१ ही त्याची आतापर्यंतची नीचांकी पातळी होती. यापूर्वी, ३० जुलैला सत्रादरम्यान रुपयाने इतकी मोठी घसरण नोंदवली होती. तेव्हा एका सत्रात रुपया ८९ पैशांनी घसरला होता.

डॉलरच्या तुलनेत रुपयाचा विनिमय दर कोणत्याही विशिष्ट पातळीवर राखण्याचा प्रयत्न नसल्याचे, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी गुरुवारीच विधान केले होते. मात्र दुसऱ्याच दिवशी चलन बाजारात रुपयाने नीचांकी लोळण घेतल्याचे चित्र दिसून आले. अलिकडच्या काळातील रुपयाची घसरण ही मुख्यतः डॉलरच्या वाढलेल्या मागणीमुळे आहे. मात्र देशाचा परकीय चलन साठा योग्य पातळीवर असून तो परराष्ट्र व्यापाराला पुरेसे संरक्षण प्रदान करतो. भारताचा अमेरिकेशी व्यापार करार झाल्यांनतर रुपयावरील ताण कमी होईल, असेही मल्होत्रा यांनी सूचित केले.

इराणशी व्यवहार करणाऱ्या भारतीय कंपनीवर अमेरिकेने लादलेले निर्बंध, वाढती व्यापार तूट आणि अमेरिका-भारत व्यापार करारात विलंब हे घटक शुक्रवारी रुपयाची घसरणीमागे दिसून आले, असे फिनरेक्स ट्रेझरी अ‍ॅडव्हायझर्स एलएलपीचे ट्रेझरी प्रमुख आणि कार्यकारी संचालक अनिल कुमार भन्साळी म्हणाले.

'सेन्सेक्स'ची चार शतकी माघार

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: कमकुवत जागतिक कल आणि डिसेंबरमध्ये अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची आशा धूसर झाल्यामुळे सप्ताहअखेर गुंतवणूकदारांनी समभाग विक्रीचा मारा केला. शुक्रवारी सलग दोन सत्रातील तेजीची मालिका खंडित होत सेन्सेक्स आणि निफ्टी गुरुवारच्या सत्रातील उच्चांकी पातळीवरून माघारी फिरले.

सेन्सेक्स ४००.७६ अंशांनी घसरून ८५,२३१.९२ पातळीवर स्थिरावला. दिवसभरात त्याने ४४४.८४ अंश गमावत ८५,१८७.८४ या सत्रातील नीचांकाला स्पर्श केला होता. निफ्टी १२४ अंश माघारी फिरला आणि २६,०६८.१५ पातळीवर बंद झाला. मागील दोन सत्रांमध्ये निफ्टीने तेजी दर्शवत २६ हजारांची पातळी ओलांडली आहे.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड | नोंदणीकृत कार्यालयः सहावा मजला,बी बिल्डींग,गंगा टुएनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र411014 शाखा कार्यालय युनिटः एफएफ11, चौथा मजला, गिरीश हाइट्स, एलआयसी स्क्वेअर जवळ, कामठी रोड, खसरा क्र. 101/2, सिटी सर्वे क्र. 1870, शीट क्र. 137/29, मौजा सीताबर्डी, नागपूर, महाराष्ट्र

ई-लिलाव - विक्री सूचना (सर्फेसी अधिनियमांतर्गत अचल अनामत मत्तेची विक्री)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 व 9 सह वाचण्यात येणारया सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 (''अधिनियम'') अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाणकार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (सदर अधिनियमानुसार यापुढे ''सुरक्षित धनको'' असा उल्लेख करण्यात येईल) कडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचनेच्या अनुषंगाने सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स मधील नियम 8 व 9 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत ताबा घेतलेला आहे.

सदर अनामत मत्तांची ई-लिलावाच्या माध्यमातून 18/10/2025 रोजी **''जशी आहे जेथे आहे, जशी आहे जे काही आहे आणि तेथे जे काही आह''** तत्त्वावर करण्यात येईल. याद्वारे आम जनतेस हे सूचित करण्यात येते की **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून जाहीर लिलाव राबविण्यात येणार आहे. विक्रीच्या अटी व शर्तीसाठी कृपया जीएचएफएल/ सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे **www.grihumhousing.com** येथे दिलेली लिंक पाहावी.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव {ए}	मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम {बी}	ताब्याचा प्रकार {सी}	मालमत्तेचा तपशील {डी}	आरक्षित किंमत {ई}	बयाणा रक्कम (आ.कि. च्या 10%){एफ}	बयाणा रक्कम प्रस्तुतीकरण दिनांक (जी)	बोली वृद्धी {एच}	मालमत्ता पाहणीचा दिनांक आणि वेळ {आय}	लिलाव दिनांक आणि वेळ {जे}	असल्यास ज्ञात बोजे/ न्यायालयीन खटले {के}
1	कर्ज क्र. HL0062810000000 5017339 रुपेश श्री कृष्णा सेडाम (कर्जदार), रेणुका रुपेश सेडाम (सह-कर्जदार)	सूचना दिनांकः 07/01/2025 एकूण थकबाकीः दि. 07/01/2025 रोजी देय रु. 1593196/- (रुपये पंधरा लक्ष त्र्याण्णव हजार एकशे शहाण्णव फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतचे वार्षिक 13% दराने व्याज.	प्रत्यक्ष	घरकुल क्र. 12/9, क्षेत्रफळ सुमारे 21.00 चौ.फू., बिल्ट-अप क्षेत्रफळ 16.71 चौ.मी., खसरा क्र. 19/1, 20 आणि 21 चा भाग, मौजा-भामटी, नागपूर हाऊसिंग आणि एरिया डेवलपमेंट बोर्डच्या स्कीममध्ये, 248 घरकुले विकसित करणारी, एलआयजी स्कीम भामटी-परसोडी नागपूर अंतर्गत, सीटी सर्वे क्र. 5 आणि शीट क्र. 8, नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, घर क्र. 4017/ए/586, वॉर्ड क्र. 75, तहसील आणि जिल्हा नागपूर. चतुःसीमाः पूर्वेस- श्री. कांबळे यांचे घरकुल, पश्चिमेस-रस्ता, उत्तरेस- श्री. उगे यांचे घरकुल आणि दक्षिणेस- श्री. गवते यांचे घरकुल.	रु. 1483300/- (रुपये चौदा लक्ष त्र्याऐंशी हजार तीनशे फक्त)	रु. 148330/- (रुपये एक लक्ष अठ्ठेचाळीस हजार तीनशे तीस फक्त)	29/11/2025 रोजी सायं. 5 वाजेपर्यंत	10,000/-	25/11/2025 (स.11-दु.4)	08/12/2025 (स.11-दु.2)	निरंक

इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी बोली सादर करण्याअगोदर सुरक्षित धनकोची शाखा आणि लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तांना भेट द्यावी आणि स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्के, बोजे आणि तिसरया पक्षाचे हित इ. बाबत चौकशी करावी आणि सर्व प्रकारे स्वतःची खात्री करून घ्यावी. मालमत्तेशी संबंधित सर्व वैधानिक देणी म्हणजे मालमत्ता कर, वीज / पाणी बिलाची थकबाकी आणि असल्यास, इतर शुल्के यांबाबत चौकशी करण्याची आणि त्यांचा भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदाराची असेल. इच्छुक बोलीदारांना ई-बोलीसाठी लिलाव सेवा पुरवठादार सी1 इंडिया प्रा.लि., पत्ता- प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, गुडगाव, हरयाणा- 122003 यांचेकडे पोर्टलवर नोंदणी करणे आणि पुरेसा वेळ असतांना लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. हेल्पलाईन क्रमांक-7291981124, 25, 26 सपोर्ट ईमेल आयडी- Support@bankeauctions.com. **संपर्क व्यक्ती - धरणी पी., ईमेल आयडी- dharani.p@c1india.com, संपर्क क्र.: 9948182222.** कृपया लक्षात घ्यावे की संभाव्य बोलीदार केवळ त्यांचेकडून ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण प्राप्त करू शकतात. इच्छुक बोलीदारांना कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेवर काढलेली बयाणा रक्कम **''गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड-ऑक्शन प्रोसिड्स खाते'', बँक - आयसीआयसीआय बँक लि., खाते क्र. 091551000028 आयएफएससी कोडः ICIC0000915, आयसीआयसीआय बँक लि., पंचशील टेक पार्क, गणपती चौकाजवळ, 43/44, विमान नगर-411014 यांचे नावे काढलेल्या आरटीजीएस/एनईएफटी/डीडी च्या माध्यमातून दि. 29/11/2025 पर्यंत सादर करावी आणि आपले नाव https://www.bankeauctions.com येथे नोंदवावे आणि सेवा पुरवठादारांकडून युजर आयडी व पासवर्ड आणि ई-लिलावाचे प्रशिक्षण निःशुल्क प्राप्त करावे. वेबसाईटवर नोंदणी केल्यानंतर इच्छुक बोलीदारांनी/खरेदीदारांनी पुढील दस्तावेजांच्या प्रती अपलोड करून त्या ईमेल करव्यात आणि स्वाक्षांकित छापील प्रत पत्ता- एफएफ11, चौथा मजला, गिरीश हाइट्स, एलआयसी स्क्वेअर जवळ, कामठी रोड, खसरा क्र. 101/2, सिटी सर्वे क्र. 1870, शीट क्र. 137/29, मौजा सीताबर्डी, नागपूर, महाराष्ट्र येथे पाठवावी. मोबाईल क्र. +91 9567626050 ई-मेल आयडी rahul.r1@grihumhousing.com ई-लिलावात सहभागी होण्यासाठी अटी व शर्तींच्या अधिक तपशीलासाठी कृपया https://www.bankeauctions.com आणि www.grihumhousing.com येथे भेट द्यावी.**

ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदार/ गहाणकार / जामीनदार यांचेसाठी 15 दिवसांची सूचनादेखील समजण्यात यावी.

स्थानिक भाषेतील प्रकाशन व इंग्रजी वर्तमानपत्रातील प्रकाशन यांच्यात काही वाद उद्भवल्यास इंग्रजी भाषेतील न्यू इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात छापण्यात आलेला मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

दिनांकः 22.11.2025 स्थानः नागपूर | स्वा/- प्राधिकृत अधिकारी गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि.)

जना स्मॉल फायनान्स बँक (शेड्युल्ड कमर्शियल बँक) | नोंदणीकृत कार्यालयः दि फेअरवे, तळ व पहिला मजला, सर्व्हे क्र. 10/1, 11/2 व 12/2बी, डोमलूरच्या पलीकडे, कोरामंगला रिंग रोड, ईजीएल बिझनेस पार्कच्या शेजारी, चल्लघट्टा, बंगलोर-560071. शाखा कार्यालयः 101 व 102, तळ मजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र. 97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी, प्रताप नगर, नागपूर (महा) - 440022

ई-लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9 सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट (सर्फेसी अधिनियम), 2002 अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी जाहीर सूचना

निम्नस्वाक्षरीकार हे जना स्मॉल फायनान्स बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खालील मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद खात्यातील तारण मालमत्तेचा ऑनलाईन लिलाव (ई-लिलाव) खाली नमूद दिनांकास ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	मूळ कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदाराचे नाव	13-2 सूचनेचा दिनांक	ताबा दिनांक	या दिनांकास सद्य थकबाकी	मालमत्तेची पाहणी करण्याचा दिनांक व वेळ	आरक्षित किंमत रु.	बयाणा रक्कम (रु.)	ई-लिलावाचा दिनांक व वेळ	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक, वेळ व स्थान
1	51899420000074	1) श्री. गोविंदा शंकर सायवान 2) श्री. रत्नमाला शंकर सायवान	09.06.2025	06.11.2025	17.11.2025 रोजी रु. 10,54,658.69 (रुपये दहा लक्ष चौपन्न हजार सहाशे अठ्ठावन्न आणि एकोणसत्तर पैसे फक्त)	29.11.2025 स. 9.00 ते सायं. 5.30 वा.	रु. 9,40,500/- (रुपये नऊ लक्ष चाळीस हजार पाचशे फक्त)	रु. 94,050/- (रुपये चौर्याण्णव हजार पन्नास फक्त)	26.12.2025 रोजी स. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत	25.12.2025 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड,101 व 102, तळ मजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र. 97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी,प्रताप नगर, नागपूर (महा) - 440022.
	मालमत्तेचे वर्णनः ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 477, एकूण क्षेत्रफळ सुमारे 1320 चौ.फू. (122.63 चौ.मी.) त्यावरील बांधकामासह, मौजा चिखला, प.ह.क्र. 08, आर.एन.एम. चिखला, ग्रामपंचायत चिखला यांच्या हद्दीत, तहसील तुमसर आणि जिल्हा भंडारा. **चतुःसीमाः पूर्वेस-** अजाबराव सायवान यांचे घर, **पश्चिमेस-** श्री. आलीम खान पठाण, **उत्तरेस-** मेन रोड आणि **दक्षिणेस-** श्री. धनराज मेश्राम यांचे घर.									
2	31559610000792	1) श्री. अब्दुल जाहिद अब्दुल सादीक, 2) श्रीमती हिनापरवीन अब्दुल जाहिद 3) श्रीमती शहनाज बानो अब्दुल सादीक, 4) श्री. अब्दुल सादीक शेख मुनाफ	21.02.2025	04.11.2025	17.11.2025 रोजी रु. 8,46,503.20 (रुपये आठ लक्ष शेहेचाळीस हजार पाचशे तीन आणि वीस पैसे फक्त)	29.11.2025 स. 9.00 ते सायं. 5.30 वा.	रु. 7,36,500/- (रुपये सात लक्ष छत्तीस हजार पाचशे फक्त)	रु. 73,650/- (रुपये त्र्याहत्तर हजार सहाशे पन्नास फक्त)	26.12.2025 रोजी स. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत	25.12.2025 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, 101 व 102, तळ मजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र. 97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी, प्रताप नगर, नागपूर (महा) - 440022.
	मालमत्तेचे वर्णनः निवासी घर ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 429, एकूण क्षेत्रफळ सुमारे 800 चौ.फू. त्यावरील बांधकामासह, मौजा धानोरा म्हाळी, वॉर्ड क्र. 2, ग्रामपंचायत धानोरा म्हाळी यांच्या हद्दीत, तहसील चांदुर रेल्वे आणि जिल्हा अमरावती. **चतुःसीमाः पूर्वेस-** मोकळा प्लॉट, **पश्चिमेस-** रस्ता, **उत्तरेस-** शेख सुभान यांचे घर आणि **दक्षिणेस-** मोकळा प्लॉट.									
3	32299430000262 32299430000272 आणि 32299430000704	1) श्री. रजनीकांत तोलीराम पटले, 2) श्रीमती लीला @ नीला रजनीकांत पटले	22.10.2024	09.01.2025	07.11.2025 रोजी रु. 40,93,940.90 (रुपये चाळीस लक्ष त्र्याण्णव हजार नऊशे चाळीस आणि नव्वद पैसे फक्त)	29.11.2025 स. 9.00 ते सायं. 5.30 वा.	रु. 24,90,000/- (रुपये चोवीस लक्ष नव्वद हजार फक्त)	रु. 2,49,000/- (रुपये दोन लक्ष एकोणपन्नास हजार फक्त)	26.12.2025 रोजी स. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत	25.12.2025 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, 101 व 102, तळ मजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र. 97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी, प्रताप नगर, नागपूर (महा) - 440022.
	मालमत्तेचे वर्णनः ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 894 (नवीन), 1041 (जुना), क्षेत्रफळ सुमारे 1456 चौ.फू. (135.31 चौ.मी.) त्यावरील बांधकामासह, सर्वे क्र. / गट क्र. 1095/3 चा भाग (नवीन), 1095/2 (जुना), प.ह.क्र. 01, ठक क्र. 39, मौजा एकोडी, ग्रामपंचायत एकोडी यांच्या हद्दीत, तहसील आणि जिल्हा गोंदिया. **चतुःसीमाः पूर्वेस-** प्लॉट क्र. 03, **पश्चिमेस-** श्री. चौधरी यांचे घर, **उत्तरेस-** गल्ली आणि **दक्षिणेस-** तिरोडा - गोंदिया रस्ता.									
4	47559610001083	1) श्री. प्रीती हनुमंत मोरे, 2) श्रीमती मोनाली हनुमंत मोरे	09.06.2025	04.11.2025	07.11.2025 रोजी रु. 23,51,874.88 (रुपये तेवीस लक्ष एक्कावन्न हजार आठशे चौर्याहत्तर आणि अठ्ठ्याऐंशी पैसे फक्त)	29.11.2025 स. 9.00 ते सायं. 5.30 वा.	रु. 15,96,045/- (रुपये पंधरा लक्ष शहाण्णव हजार पंचेचाळीस फक्त)	रु. 1,59,604.50/- (रुपये एक लक्ष एकोणसाठ हजार सहाशे चार आणि पन्नास पैसे फक्त)	26.12.2025 रोजी स. 11.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत	25.12.2025 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत. जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, 101 व 102, तळ मजला, परफेक्ट प्लाझा (प्रसादम), प्लॉट क्र. 97, सिमेंट रोड, टेलिग्राफ कॉलनी, प्रताप नगर, नागपूर (महा) - 440022.
	मालमत्तेचे वर्णनः महानगर पालिका घर क्र. 6713/ए (नवीन) आणि 1225 (जुना) चा उत्तर भाग, एकूण क्षेत्रफळ सुमारे 534 चौ.फू. (49.72 चौ.मी.) त्यावरील बांधकामासह, सिटी सर्वे क्र. 452 आणि शीट क्र. 412/29, वॉर्ड क्र. 14, मौजा मानेवाडा, प.ह.क्र. 39, नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, तहसील आणि जिल्हा नागपूर. **चतुःसीमाः पूर्वेस-** ग्रील, **पश्चिमेस-** रस्ता, **उत्तरेस-** रस्ता, **दक्षिणेस-** श्री. शेंडेकर यांचे घर.									

सदर मालमत्तांची **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्यात येणार आहे आणि ई-लिलाव हा **ऑनलाईन** घेण्यात येईल. वर नमूद मालमत्तेच्या संदर्भात सर्व भरणा **जना स्मॉल फायनान्स बँक** यांचे नावे करण्यात यावा. लिलाव हा बँकेचे मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार **मे. फोरक्लोजर** यांचेद्वारे **https://bankauctions.in आणि www.foreclosureindia.com** या वेब पोर्टलवर घेण्यात येईल. अधिक माहिती आणि तपशील, साहाय्य, प्रक्रिया आणि ई-लिलावाच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदारांनी **मे. फोरक्लोजर** यांचेशी संपर्क साधावा, श्री. नितेश पवार, संपर्क क्रमांकः 8142000725, **ई-मेल आयडीः nitesh@bankauctions.in, info@bankauctions.in.** ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठीच्या अटी व शर्तींचा अधिक तपशील आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी कृपया **जना स्मॉल फायनान्स बँक चे अधिकारी श्री. रंजन नाईक (मोबा. क्र. 6362951653)** यांचेशी संपर्क साधावा. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार सदर मालमत्तांवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, संभाव्य बोलीदारांनी आपली बोली सादर करण्याअगोदर विक्रीस काढलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालकी हक्क इ. बाबत स्वतः स्वतंत्रपणे चौकशी करावी. अटी असलेल्या बोली स्वीकारण्यात येणार नाहीत. ही वर नमूद कर्जदार/जामीनदार/गहाणकारांसाठी तारण मालमत्तांचा ई-लिलाव घेणार येत असल्याबाबतची सूचनादेखील आहे. याद्वारे कर्जदार/जामीनदार/गहाणकारांना सूचित करण्यात येते की त्यांनी लिलावाच्या दिनांकाअगोदर अद्ययावत व्याज आणि आनुषंगिक खर्चासह वर नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा, अन्यथा मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कांसह वसूल करण्यात येईल.

दिनांकः 22.11.2025, स्थानः नागपूर | स्वा/- प्राधिकृत अधिकारी, जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

GOVERNMENT OF MAHARASHTRA
COMMISSIONERATE OF HEALTH SERVICES, MUMBAI.
Procurement Cell, 6th Floor, Arogya Bhavan,
St.Georges Hospital Compund, Mumbai - 400 001.
Email: procurementcell@gmail.com

TENDER NOTICE

Date : 19-11-2025

Tender Reference No. E-01 CHS/PC/RFP for Empanelment of Agencies for providing Skilled and Unskilled Manpower Services to Public Health Department, govt. of Maharashtra/2025-26

1. Joint Director of Health Services (Procurement Cell), Mumbai on behalf of Government of Maharashtra invites tenders in RFP for Empanelment of Agencies for providing Skilled and Unskilled Manpower Services to Public Health Department, Govt. of Maharashtra / 2025-26

Tender No.	Name of Facility	Period of sale, preparation and submission of bid	Date of Pre-Bid Meeting	Date of Bid Closing	Date of Bid Opening
E-01 GeM Portal	Tenders for RFP for Empanelment of Agencies for providing Skilled and Unskilled Manpower Services to Public Health Department, Govt. of Maharashtra / 2025-26	19.11.2025 10:00 hrs to 09.12.2025 14:00 hrs	27.11.2025 14:00 hrs	09.12.2025 14:00 hrs	10.12.2025 14:30 hrs

2. For detailed information, the interested in service providers may visit the website **https://gem. gov.in**
3. The Joint Director of Health Services (P. Cell), Mumbai reserves the right to increase or decrease the quantity to be purchased and also reserves the right to cancel all the tenders without giving any reason to.

For e-tendering help/ information, please contact.
Website :- https://gem.gov.in
Contact : Toll Free No. : 1800-419-3436; 1800-102-3436
Email: procurementcell@gmail.com

(Dr. Sachin Tadas)
Jt. Director of Health Services
(Procurement Cell) Mumbai.

ICICI Bank | **शाखा कार्यालय:** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, विष्णू वैभव कॉम्प्लेक्स, सहावा मजला, २२२ पाम रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४०००१

जाहीर सूचना - तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई- लिलाव

[नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा]
स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ सह नियम ८(६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचा ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य लोक आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज्ड करण्यात आली असुन, त्याचा प्रत्यक्ष ताबा आयसीआयसीआय बँक लि. चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे'' आणि ''तेथे जे असेल ते'' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

अ. क्रं.	कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील	थकबाकी रक्कम ₹	आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹	मालमत्तेच्या परीक्षणची तारीख आणि वेळ	ई-लिलाव तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
1.	कृष्णा मेडिकल एजन्सीज (कर्जदाराचे), श्री अशोक रामचंद्रराव ठाकरे, श्री संदीप रमेश ठाकरे, श्री धनराज रामचंद्र ठाकरे, श्रीमती रेखा धनराज ठाकरे, श्रीमती मोनाली संदीप ठाकरे, श्रीमती शालू अशोक ठाकरे (हमीदाराचे/ गहाणखत), कर्ज खाते क्रमांक 186705001713	दुकान क्रमांक ए-२३, तळमजला, एनआयटी कॉम्प्लेक्स, नागपूर सुधार न्यास, औद्योगिक बस्ती, खसरा क्रमांक ७, मौजा हरपूर विभाग, दक्षिण बेअरिंग शीट क्रमांक १०, शहर सर्वेक्षण क्रमांक ८९०, महानगरपालिका घर क्रमांक २९०८/ए/२३, वॉर्ड क्रमांक २०, आयुर्वेदिक महाविद्यालय, हरपूर, नागपूर सुधार न्यास, हरपूर, नागपूर, तहसील आणि जिल्हा नागपूर, महाराष्ट्र- ४४००२१. मोजमापित क्षेत्र- एकूण बिल्टअप एरिया २३.०० चौरस मीटर म्हणजे २४७.५७ चौरस फूट	₹ ४७,९८,५८२/- (नोव्हेंबर १८, २०२५ पर्यंत)	₹ १५,००,०००/- / ₹ १,५०,०००/-	डिसेंबर ०१,२०२५ सकाळी ११:०० दुपारी ०२:०० पर्यंत	डिसेंबर १२, २०२५ सकाळी ११:०० पासून

ऑनलाईन लिलाव **(URL Link-https://disposalhub.com) मे. नेक्सझेन सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड** या ई-लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **डिसेंबर ११, २०२५** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड. विष्णू वैभव कॉम्प्लेक्स, सहावा मजला, २२२ पाम रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४०००१** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **डिसेंबर ११, २०२५** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **डिसेंबर ११, २०२५** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह - डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड. विष्णू वैभव कॉम्प्लेक्स, सहावा मजला, २२२ पाम रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर- ४४०००१** येथे **डिसेंबर ११, २०२५** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **''आयसीआयसीआय बँक लिमिटेड''** यांच्या नावे **नागपूर** येथे देय सादर करावा.

तपासणीसंबंधित, ई-लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया **आयसीआयसीआय बँक** कर्मचारी फोन नंबर **९३२६०६६६८० / ९१६८६८८५२९** वर संपर्क करा.

कृपया नोंद घ्यावी की मार्केटिंग एजन्सीज **१.व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, २. ऑजिओ अ‍ॅसेट्स मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, ३. मॅटेक्स नेट प्रायव्हेट लिमिटेड, ४. फिनविन इस्टेट डील टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, ५. गिरनारसॉफ्ट प्रायव्हेट लिमिटेड, ६. हेक्टा प्रॉप टेक प्रायव्हेट लिमिटेड, ७. आर्का एमार्ट प्रायव्हेट लिमिटेड, ८. नोव्हेल अ‍ॅसेट सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, ९. नोब्रोकर टेक्नॉलॉजीज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांनादेखील सदर मालमत्तेच्या विक्री सुविधेसाठी नेमण्यात आले आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.

विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

दिनांक : नोव्हेंबर २१, २०२५, ठिकाण : नागपूर | **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४००००. फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.